# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 14/11/2022 (सोमवार) सायंकाळ

---

## गृहअतिक्रमण करून विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बुट्टीबोरी:– दिनांक २१/०९/२०१८ चे ०३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रंजना शेखर ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. कोलार नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अप. क्र. ५६७/२०१९ कलम ३५४(अ), ४४८ सहकलम ४, ६ पोक्सो. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २०/०९/२०१८ चे १५.३० वा. दरम्यान आरोपी नामे– प्रमोद रामरावजी ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. कोलार ता. नागपूर जि. नागपूर याने पिडीत मुलगी, वय १० वर्ष, रा. कोलार ही आपल्या घरी अभ्यास करीत एकटी बसली असता आरोपीने तिच्या घरी जावून तिचे सोबत लैंगिक छळ केला. आरोपीला दिनांक २१/०९/२०१८ चे ०४.०३ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनाक १४/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. राठी सा. अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४(बी) भांदवि. व ११, १२ पोक्सो ॲक्ट मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व ३०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास व कलम ४४८ भांदवि मध्ये ०६ महिने सश्रम कारावास व १०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोलीस हवालदार अनिल व्यवहारे, पोलीस हवालदार श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

## गंभीर दुखापत

**पो.स्टे. खापरखेडा –** अंतर्गत मौजा वार्ड नं. ०२, चांदनी चौक, सिल्लेवाडा येथे दिनांक १४/११/२०२२ चे १२.०० वा. दरम्यान सुमारास फिर्यादी नामे– सौ. दिपा दुर्गाप्रसाद कुमरे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. ०२, चांदनी चौक, सिल्लेवाडा ता. सावनेर ही व तिची मैत्रिण नामे– सुनिता हिच्या सोबत तिच्या राहते घरी हजर असताना घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे– रिंकु नारनवरे रा. सिल्लेवाडा तिथे आला व जोरजोराने फिर्यादीच्या मैत्रिणीच्या नावाने शिवीगाळ करू लागला तसेच यातील फिर्यादी हिने आरोपीस घराच्या आत येण्यास मनाई केली असता आरोपी हा जबरदस्ती घराच्या आत शिरला व शिवीगाळ करत असताना फिर्यादीच्या तोंडावर मारून फिर्यादीचे दात हालवले व शिवीगाळ करून तिथुन निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपीविरुध्द ४५२, ३२५, ५०४ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. उमरेड :–** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील चिचघरे ले आउट उमरेड स्वत:चे घरी येथे दिनांक १२/११/२०२२ चे ११.०० वा. पुर्वी सुमारास यातील **मृतक नामे**– कृष्णा भाऊराव गंडाईत, वय २६ वर्ष, रा. चिचघरे ले आऊट, उमरेड हा स्वत:चे राहत असलेल्या घरात समोरील दरवाज्याला आतुन कडी लावुन घराची खिडकी बंद करून समोरील खोली मध्ये असलेल्या सिलींग फॅनला काळया रंगाचे ओढणीने गळफास घेवुन मरण पावला आणि दिवान वरती ठेवलेल्या लग्नाच्या पत्रिकेच्या मागच्या बाजुस कव्हरवर ‘‘मी स्वत:मुळे आत्महत्या करत आहोत मोनी तु जाजो नको कुठे ईथेच रायसीन’’ असे लिहुन होते.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नागेश भाऊराव गंडाईत यांचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन उमरेड करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**